राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) राबविण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पीएमएवाय-जी-२०१६/प्र.क्र.३३३/योजना-१०**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: १४ ऑक्टोबर, २०१६.

**वाचा -**

1) **केंद्र शासन, ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.J-११०१४/१/२०१४-RH, दिनांक ०७ एप्रिल, २०१६.**

**प्रस्तावना -**

केंद्र शासनाने इंदिरा आवास योजनेचे रूपांतर प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये केले असून राज्यात या योजनेची अंमलबजावणी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षापासून करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून नविन मंजूर घरकुलांकरिता साधारण क्षेत्र रू.१.२० लक्ष व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्राकरिता रू.१.३० लक्ष इतकी प्रती घरकुल किंमत निश्चित केलेली आहे. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मध्ये प्रामुख्याने पूर्वीच्या इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलाचे क्षेत्रफळ २० चौ.मीटर वरून वाढवून २५ चौ.मीटर एवढे करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे लाभार्थींची निवड सामाजिक आर्थिक जात सर्वेक्षण-२०११ मधील माहितीच्या आधारे करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) राज्यात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून नविन मंजूर घरकुलांकरिता साधारण क्षेत्र रू.१.२० लक्ष व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्राकरिता रू.१.३० लक्ष इतकी प्रती घरकुल किंमत निश्चित केलेली आहे. राज्यात केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) खालीलप्रमाणे राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत प्रति घरकुल अनुदान साधारण क्षेत्र रू.१,२०,०००/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रू.१,३०,०००/- एवढे अनुज्ञेय असेल.

प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० प्रमाणानुसार प्रति घरकुल साधारण क्षेत्राकरिता रू.४८,०००/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्राकरिता रू.५२,००० प्रमाणे राज्य हिस्सा एवढा राहील.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत संवर्गनिहाय राज्य हिश्याचा निधी सर्वसाधारण संवर्गाकरिता ग्राम विकास विभाग, अनुसूचित जाती संवर्गाकरिता सामाजिक न्याय विभाग, अनुसूचित जमातीकरिता आदिवासी विकास विभाग व अल्पसंख्यांक संवर्गाकरिता अल्पसंख्याक विकास विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत लाभार्थ्यांची निवड सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ च्या माहितीच्या आधारे करण्यात येईल.

प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घरकुल बांधकाम क्षेत्रफळाची मर्यादा २५ चौ.मी. एवढी असेल.

प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत केंद्र व राज्य हिस्सा लाभार्थ्यांच्या बँक खात्यात PFMS (Public Financial Management System) प्रणालीव्दारे थेट वितरीत करण्यात येईल.

हा शासन निर्णय मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयाचे अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१४११५२०७९९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(असीम गुप्ता)**
सचिव, ग्राम विकास विभाग

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व विधानसभा व विधान परिषद सदस्य
६) मा.मुख्य सचिव, यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
८) महालेखापाल (लेखापरीक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
१०) महालेखापाल (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३) अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व)
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य जीवनन्योती अभियान, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई
१८) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सी.बी.डी.,बेलापूर, नवी मुंबई
१९) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२१) ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२२) उप सचिव, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) उप सचिव, नियोजन (का.१४११ व १४१४) व वित्त विभाग (का.व्यय-१५ व अर्थ-१७) मंत्रालय, मुंबई
२४) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
२५) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२६) अतिरिक्त संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
२७) निवड नस्ती (कार्यासन योजना-१०)